
# गीतामृताचा प्रवाह

## रामकृष्ण महाराज आणि वारकरी संप्रदाय



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

संपादक
प्रा.डॉ.रामकृष्ण बदने

कार्यकारी संपादक
ह.भ.प.तुकाराम शास्त्री मुंडे महार
भानुदास (भाऊराजे) बाबुराव

# गीतामृताचा प्रवाह : रामकृष्ण महाराज आणि वारकरी संप्रदाय


© प्रा.डॉ. रामकृष्ण बदने

ह.भ.प.तुकाराम महाराज मुंडे शास्त्री

भानुदास(भाऊराजे) बाबुराव केंद्रे



❖ **Publisher :**

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
Limbaganesh, Dist. Beed (Maharashtra)
Pin-431126, vidyawarta@gmail.com
9850203295

❖ **Printed by :**

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
**www.vidyawarta.com**
7588057695

❖ **Page design & Cover :**
H.P. Office (Source by Google)

❖ **Edition:** April 2022

**ISBN 978-93-92584-95-4**

❖ **Price : 299 / -**



Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



www. विद्यावार्ता .कॉम
YouTube Channel



All Rights Reserved, No part of this publication may be reproduced, or transmitted, in any form or by any me electronic mechanical, recording, scanning or otherwise, without the prior written permission of the copy owner. Responsibility for the facts stated, opinions expressed. Conclusions reached and plagiarism, If any, ir volume is entirely that of the Author. The Publisher bears no responsibility for them. What so ever.Disputes, I shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)

# || अनुक्रमणिका ||

भाग --०२

❖ वारकरी संप्रदाय : विविध आयाम


०१) वारकरी संप्रदाय: विचार, लक्षणे आणि आचरणप्रधानता
प्रा.डॉ.विठ्ठल खंडूजी जायभाये, परभणी ||51

०२) वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान
डॉ.नवनाथ रासकर, फलटण ||59

०३) श्रीमद्‌भगवद्‌गीता आणि प्रस्थानत्रयी
डॉ.पुरुषोत्तम शेषराव जुन्ने, जालना ||65

०४) जगायला शिकवणारी पंढरीची वारी,ऊर्जादायी आकर्षणे, मुल्य ...
उध्दव(बापू) फड, लातूर ||70

०५) वारकरी संप्रदायाची सर्वसमावेशक साधना अखंड हरिनाम ...
श्री. ह.भ.प. प्रा.डॉ.रामायणाचार्य नाना महाराज कदम ||78

०६) वारकरी संप्रदाय कीर्तन परंपरा
प्रा. विद्या खाडे (दळवे), बीड ||80

०७) वारकरी संगीत परंपरा — प्राचीन आणि अर्वाचीन
पं. यादवराज फड, पुणे ||83

०८) लोकगीतातून येणारे पंढरपूर महात्म्य
प्रा.डॉ. पंडित आनंदराव शिंदे, नांदेड ||85

०९) संतसाहित्य वर्णित वारकरी संप्रदाय व तीर्थक्षेत्र 'पंढरी' महात्म्य
प्रा.डॉ.अनिल व्यंकटराव मुंढे, लातूर ||89

१०) आळंदी हे गाव । पुण्यभूमी ठाव।।
प्रा.अविनाश खोखले, लातूर ||94

११) वारकरी संप्रदायात स्त्रीचे स्थान माऊलीमय
डॉ. विजयकुमार पं. फड, औरंगाबाद ||104


Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# ०१ वारकरी संप्रदाय: विचार, लक्षणे आणि आचरणप्रधानता

प्रा.डॉ.विठ्ठल खंडूजी जायभाये
जि. परभणी (महाराष्ट्र)

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani
Late Ramesh Warpudkar ACS College ★ Sonpeth Pin-431516 ★ Ta.Sonpeth Dist.Parbhani

विविध कलाविष्कार आणि संस्कृतीनी नटलेला विचारसमृद्ध दैदिप्यमान महाराष्ट्र म्हणजे भारत वर्षातील एकमेवाद्वितीय राज्य ! महाराष्ट्राचा इतिहास आणि भूगोल महनीय व्यक्तींच्या कार्यकर्तृत्व आणि विचारांनी नित्य झळकतांना भारताच्या इतिहासात आपली ओळख निर्माण करून आपले वेगळेपण टिकवून आहे ! भारतातील अनेक वैचारिक आणि समाजसुधारणांची रुजूवातच महाराष्ट्रातून झालेली निदर्शनास येते. याच वैचारिक आणि प्रबोधन परंपरा आणि चळवळीतील अत्यंत महत्वपूर्ण चळवळ म्हणजे अनेक वर्षांचा इतिहास आणि समृद्ध परंपरा असलेला वारकरी संप्रदाय होय. तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात आद्य वारकरी संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाचे आपल्या कीर्तन आणि अभंगाच्या माध्यमातून पुनरुज्जीवन करण्याचे महत्कार्य केले. "नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी" सारखे अभंग लिहून ज्ञान आणि संप्रदाय याची सांगड घालण्याचे महान कार्य केले. असा हा वारकरी संप्रदाय इतिहास आणि आपला भूगोल घेऊन महाराष्ट्र, कर्नाटक आणि पंजाब पर्यंत जाऊन आपली प्रबोधन पताका फडकावून आला आहे. आज हा संप्रदाय चारशे ते पाचशे वर्षांचे लेखी पुरावे घेऊन नित्य नित्य प्रवाही आहे.

## वारकरी संप्रदाय: स्वरूप आणि व्याप्ती

संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेवांनी अत्यंत खडतर काळात वारकरी संप्रदाय रुजविला. संत ज्ञानेश्वर महाराज मूलत: नाथ संप्रदायाचे. "आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा । मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य" हा अभंग संत ज्ञानेश्वर हे नाथ संप्रदायाचे पायिक आणि महायोगी होते हे सिद्ध करतो. त्याचबरोबर संत ज्ञानेश्वर हे संत निवृत्तीनाथ, संत सोपानदेव आणि बहिण मुक्ताबाई आदि भावंडांबरोबर आपले योग्यांचे जीवन व्यतीत करीत होते. त्यांचे आई–वडील नामे श्री विठ्ठलपंत आणि सौ.रुक्मिणी यांना धर्ममार्तंडांन प्रायश्चित म्हणून जलसमाधी घेण्यास भाग पाडले. एवढ्यावर समाधान न झाल्यामुळे या चारही भावडांन शुद्धिपत्र आणण्यासाठी जंगजंग पछाडले. त्यांना मांडे भाजायला साधे खापर मिळू दिले नाही आणि धर्मबहिष्कृत केले. हे वर्णव्यवस्थेचे जळजळीत इंगळ घेऊन हे चारही भावंडं वणवण फिरत होते. त्या काळात दुसरीकडे वारकरी संप्रदायातील जेष्ठ संत जनाबाई, संत नामदेव, संत चोखामेळा, संत गोरे काका आदिकरून सर्व संत–वारकरी पंढरीच्या विठ्ठल भक्तीत रंगून गेले होते. हे सर्वच संत सर्वसमावेशक विचार घेऊन पंढरपूरच्या वाळवंटात भजन कीर्तनात दंग झाले होते.

यारे यारे लहान थोर । याती भलत्या नारी ।
करावा विचार । न लगे चिंता कवणासी ।

हा वैश्विक आणि सर्व समावेशक विचार घेऊन हे संत वारकरी संप्रदायाचे व्यापक लोकाभिमुख करत होते. हा भेद आणि वर्णव्यवस्थेच्या पलीकडे जाऊन विचार–आचार करणारा स समाजाभिमुख झाला होता. ही गोष्ट संत ज्ञानेश्वरादि भावडांना कळली. त्यांची आणि सर्वच व

संतांनी मांदियाळी पंढरपूरच्या वाळवंटात जमली आणि त्यांनी एकत्र वारकरी संप्रदाय ... एकमेकांना अभिवचन दिले. त्यांची भजनं—कीर्तनं वाळवंटात रंगू लागली. एकमेकांना कीर्तन—... साथ—संगत सुरु झाली. हे पंढरीच्या वाळवंटातील संपूर्ण जिवंत समालोचन (रनिंग कमेंट्री) ... संत जनाबाई आपल्या

नामदेव कीर्तन करी पुढे देव नाचे पांडुरंग । जनी म्हणे ज्ञानदेवा बोला अभंग ।।
अभंग बोलता बोलता रंग कीर्तनासी भरला । प्रेमाचेनी छंदे विठ्ठल नाचू लागला ।।
नाचता डोलता देवाचा गळला पितांबर । सावध होई देवा ऐसे बोले कबीर ।।
नामयाची जनी लोळे संतांचे पायी । जन्ममरणापासुनी मुक्त करी गे विठाबाई ।।

या अलौकिक अभंगातून सर्वांसमोर उभ्या करतात आणि अशिक्षित संत जनाईची दिव्य प्रतिभा उच्चशिक्षित लोकांना तोंडात बोट घालायला भाग पाडते. म्हणजेच संत जनाबाई सर्वांत जेष्ठतेच्या नात्याने नामदेवांना कीर्तनासाठी प्रवृत्त करत्या झाल्या आणि संत नामदेवांच्या कीर्तनात प्रत्यक्ष वारकऱ्यांचे दैवत श्री विठ्ठल हे दंग होऊन नाचत होते आणि संत ज्ञानेश्वर, संत कबीर, संत चोखामेळा, संत सावता आणि इतर सर्वच समकालीन संत चाल म्हणायला, टाळ—मृदंग वाजवायला उभे होते. वारकऱ्यांचे ... सर्वधर्म समभाव आणि समतेचे वैश्विक तत्व संत ज्ञानेश्वरादि भावंडांना कळले आणि त्यांनी या सर्व संतांसोबातच वारकरी संप्रदाय ध्वज हाती घेतला. त्यानंतर संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वर यांनी मिळून भारतभ्रमण आणि तीर्थयात्रा केल्याचे अनेक अभंग—पुरावे संत नामदेवांनी लिहलेले आपल्याला आढळून येतात. तदनंतर संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी, हरिपाठ या सारखे वारकरी संप्रदायांना प्रासादिक ग्रंथ प्रदान केलेले दिसून येते.

त्यानंतर मधल्या काळात संत जनाबाई, संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव यांच्या प्रभावळीतील संतांनी मोठ्या कठीण परिस्थितीत वारकरी संप्रदायाची पताका नेटाने फडकवीत ठेवली. विविध मुस्लिम शाह्यांची आक्रमणे, अनेक राजे आणि राजकीय उलथापालथ यामध्ये वारकरी धर्म कठीण परिस्थितून जात होता. उघड चालणारी भजन—कीर्तन बंदिस्त झाली. तरी पण संत बंका, संत निर्मळा आणि समकालीन संतांनी सामान्य वारकऱ्यांच्या मदतीने वारकरी संप्रदाय टिकवून ठेवला. सोळाव्या शतकांत संत एकनाथांनी पुनश्च वारकरी संप्रदायाचे अधिष्ठान घट्ट केले. संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वर यांच्यासारखेच अभंग, हरिपाठ आणि भागवत आदि ग्रंथ लिखाण केली तसेच ज्ञानेश्वरीचे पुनर्लेखनही केले. संत एकनाथांनी आपले श्रीगुरू संत जनार्धन स्वामी यांच्या मदतीने वारकरी संप्रदाय समृद्ध बनवला. त्यांनी वारकरी कीर्तन आणि पंढरीची वारी या दोन परंपरा सामान्य वारकऱ्यांच्या सहकार्याने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात नेल्या. संत एकनाथांनी वारकरी संप्रदायाचा पुन्हा दरारा निर्माण करून सर्वसमावेशक विचार पुन्हा एकदा महाराष्ट्रभर पुनर्स्थापित केला. संत एकनाथांच्या जीवनातील अनेक प्रसंग आणि त्यांनी केलेली भक्ती वारकरी संप्रदायाला 'खांबा सारखी' बळकटी देऊन गेली.

सतराव्या शतकांत संत तुकोबाराय यांनी आपल्या भक्ती आणि वैराग्याच्या जोरावर अक्षरश: वारकरी संप्रदायास 'कळस' चढविला. आपल्या वडिलांची हजारो वर्षांची भक्तीची मिरासी जपण्याचे अभिवचन स्वत:च घेतले आणि अत्यंत खडतर काळात त्याची रुजवणूक केली. वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ आदि संतांच्या वचनांचा समृद्ध वसा आणि वारसा तुकोबांना वाचायला, बोलायला आणि लिहायला हत्तीचे बळ देऊन गेला. सोळाव्या शतकांत देखील वर्णव्यवस्थेची

Late Ramesh Warpudkar ACS College ★ Sonpeth Pin-431516 ★ Ta.Sonpeth Dist.Parbhani

होऊन अत्यंत बळकट होती. त्याचाच परिणाम म्हणून कुणबी असलेल्या तुकोबांना तत्कालीन धर्ममार्तंडांनी अभंग लिहायला आणि कीर्तन करायला मज्जाव केला. परंतु संत तुकोबांनी विठ्ठलभक्तीच्या आणि सामान्य वारकऱ्यांच्या शक्तीच्या सामर्थ्याने आपले अलौकिक कार्य मोठ्या नेटाने चालून ठेवले. एवढी धर्ममार्तंडांनी तुकोबांना काठ्यांनी मारले, त्यांचे अभंग बुडविले. मात्र तुकोबांचे अभंग हे लोकवाणी म्हणून सामान्य जणांना मुखोद्गत असल्यामुळे सर्व वारकऱ्यांनी मिळून तेरा दिवसांत तुकोबांच्या संपूर्ण गाथा लिहून त्यांना सादर केला. खऱ्या अर्थाने तुकोबांचे अभंग तरले. हे मिथक नसून तुकोबांची एकनिष्ठ विठ्ठलभक्ती आणि वाणीची अद्भुत शक्ती लोकाभिमुख झाली होती याचे प्रतिक आहे. धर्ममार्तंडांचे खाडकन डोळे उघडले. अत्यंत कमी काळात संत तुकारामांनी वारकरी संप्रदाय संतांच्या मांदियाळीत बसून आपले भक्ती–सेवा कार्य इमाने इतबारे सादर केले.

असा हा महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय शेकडो वर्षांची परंपरा घेऊन आजही समाजामध्ये प्रबोधनाचे आणि समाजसुधारणेचे कार्य करतो आहे. त्यानंतर अनेक संतांनी आपले योगदान वारकरी संप्रदायासाठी देऊन देहू, आळंदी, पंढरपूर, नरसी नामदेव, गंगाखेड आणि अशा अनेक ठिकाणी आपली शक्तिस्थाने मजबूत करून आपला सर्वसमावेशक विचार घेऊन संप्रदाय मार्गक्रमण करत आहे. त्याची व्याप्ती येथील घराघरामध्ये असून तो आज महाराष्ट्र बहुजनांचा श्वास म्हणून नित्य प्रवाही आहे. आज शेकडो कीर्तनकार, हजारो टाळकरी–माळकरी विठ्ठलभक्तीचा वसा आणि आपल्या पूजनीय संतांचा वारसा घेऊन पुढे जात आहेत. दररोज कथा–कीर्तने होत असून वारकरी संतविचार महाराष्ट्राच्या कणाकणांत दुमदुमून जातो आहे.

**वारकरी संप्रदाय लक्षणे:**

कोणताही धर्म किंवा पंथ हा काही महत्वपूर्ण विचारांच्या बैठकीवर रुजत असतो. त्या पंथाची लक्षणेच त्याचा प्रचार आणि प्रसार व्हायला कारणीभूत ठरतात. त्याच न्यायाने वारकरी संप्रदाय हा अनेक वैचारिक आणि आचरणयुक्त लक्षणे घेऊन महाराष्ट्रात रुजलेला आहे. मागील चारशेहून अधिक वर्षात अनेक संप्रदाय आले आणि काळाच्या ओघात किंवा संस्थापकाबरोबर नामशेष झाले, मात्र वारकरी संप्रदाय जसाच्या तसा तग धरून येथील व्यवस्थेला आव्हान देऊन प्रबोधन करण्यासाठी अखंड उभा आहे. या संप्रदायाची लक्षणे म्हणजे

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ ।।१।।
आइका जी तुम्ही भक्त भागवत । कराल तें हित सत्य करा ।।२।।
कोणा ही जिवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचे ।।३।।
तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे ।।४।।

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

या अभंगाचे सिंहावलोकन केले असता वारकरी संप्रदाय अगदी एखाद्या खुल्या पुस्तकासारखा सर्वांना खुला असून हा संप्रदाय भेदाभेद शून्य, द्वेष–मत्सर रहित अगदी माणसाच्या अवयवांसारखा सर्वांना समान प्राधान्य देणारा असून एकमेकांची सुःख–दुःखे वाटून घेणारा सर्वसमावेशक संप्रदाय आहे. जातीभेद, वर्णभेद किंवा वंशभेद इत्यादी अमानुष गोष्टी कुठेच आढळत नाहीत आणि आढळल्या तर तो वारकरी सांप्रदायिक नाही असे म्हणावे. ''खटनट यावे शुद्ध होऊनि जावे । दवंडी पिटी भावे चोखामेळा ।।'' हा संत चोखामेळा महाराज यांचा हा अभंग आणखी महत्वपूर्ण आहे. कोणतेही बाह्य अवडंबर न माजवता गळ्यात तुलसीची माळ, सामान्य पांढरे धोतर किंवा पायजामा, पांढरा खमीस, डोक्यावर पांढरी

टोपी, कपाळाला अबीरबुक्का–अष्टगंध, मुखात रामकृष्णहरी हा बीजमंत्र आणि गळ्यात ... पंढरपूरच्या आषाढी–कार्तिकीच्या दोन वाऱ्या करणे. बस्स, याशिवाय आणखी कोणतेच अवडंबर करण्याची वारकऱ्याला आवश्यकता नाही. याचबरोबर चोरी करू नये, व्यभिचार करू नये, ... व्यवहारात बुडवू नये, आई–वडिलाची सेवा करावी, दिलेले काम इमानदारीने करावे. ... रुचणारी–पचणारी लक्षणे वारकरी संप्रदायाची असल्यामुळेच आजतागायत संप्रदाय नुसता टिकून ... तर त्यात दरवर्षी हजारो अनुयायांची भर पडतांना दिसते आहे आणि पंढरीच्या वारकऱ्यांची संख्या वाढत आहे.

**वारकरी संहिता**

कोणताही धर्म, पंथ अथवा संप्रदाय हा संहितेशिवाय समाजात दीर्घकाळ किंवा नित्य प्रवाही ... शकत नाही. संहिता म्हणजे ''एखादया विषयावरील अलिखित स्वरूपात अस्तित्वात असलेल्या ... लेखी स्वरूपात तयार करणे किंवा एखादा कायदा नव्यानेच लेखी स्वरूपात अस्तित्वात आणणे, ... प्रकियेला 'संहितीकरण' (कोडिफिकेशन) असे म्हटले जाते.''[१] म्हणजे वारकरी संप्रदाय जवळपास ... वर्षांपासून समाजाच्या नसानसातून वाहतो आहे त्याचे कारण म्हणजे या संप्रदायाची अलिखित ... संहिता (ब्वकम व िब्वदकनबज) प्रत्येक वारकरी बंधू–भगिनींना ज्ञात आहे. त्याचे कुठे पुस्तक जरी नसले तरी काही अभंग सहज संहिता सांगून जातात.

होय होय वारकरी। पाहे पाहे रे पंढरी ।।
काय करावी साधने। फळ अवघेचि येणे।।

म्हणजे वारकरी संप्रदायाचे पहिले अत्यंत महत्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे त्याने किंवा तिने पंढरीची वारी करणे जरुरी आहे. त्याशिवाय वारकरी संहितेत वारकरी हा ''तुळसी माळ गळा । गोपीचंदन टिळा ।।'' हे एक आणखी महत्वपूर्ण लक्षण आहे वारकरी असण्याचं. त्याचबरोबर चोरी करू नये, खोटे बोलू नये, व्यभिचार करू नये, सकाळी काकड आरतीचे अभंग, ज्ञानेश्वरी, हरिपाठ इत्यादी ग्रंथ नित्यनेमाने वाचावे. त्याचबरोबर वारकऱ्याने नित्यहरीनाम स्मरण करत रहावे. त्यासाठी त्याला कोणतेही बंधन अथवा मर्यादा येत नाहीत. वारकरी होण्यासाठी अन्य कोणतेही अवडंबर करण्याचे गरज नाही. संतश्रेष्ठ एकनाथ महाराजांच्या भाषेत,

नलगे तीर्थांचे भ्रमण । नलगे दंडण मुंडण ।।
नलगे पंचाग्नी साधन । तुम्ही आठवा मधुसूदना ।।

म्हणजे सहज,सोपा आणि कुणालाही, कुठेही आणि कधीही आपल्या आचरणात आणता येईल असा ''सर्वाहून सोपा'' वारकरी संप्रदाय वारकरी संतांनी लोकाभिमुख केलेला आहे. या संहितेवर वारकरी संप्रदाय उभा राहिलेला असून त्या सर्वसामान्य लोकांना करता येण्यासारख्या असल्याकारणाने आजतागायत टिकून आहे.

**उपास्य दैवत आणि वृत्त वैकल्ये:**

कोणताही धर्म अथवा संप्रदाय त्याचे उपास्य दैवत कोणते आहे आणि त्यातील संप्रदायातील वैकल्ये काय आहेत यावर तो धर्म किंवा संप्रदाय टिकून असतो. वारकरी संप्रदायाचे दैवत संत नारायण महाराजांच्या भाषेत सहजतेने सामान्य लोकांच्या लक्षात येते. संत नारायण महाराज म्हणतात,

आम्हा वृत एकादशी । देव केशव तीर्थ तुळसी ।।

Late Ramesh Warpudkar ACS College ★ Sonpeth Pin-431516 Dist.Parbhani

...येणे या साधन । अमुचा विषय हरिकीर्तन ।।

एवढं सोपं कर्म करायला वारकरी संप्रदाय सांगून आपले उपास्य दैवत आणि व्रत सांगून मोकळा झाला आहे. म्हणजे पंधरा दिवसांनी येणारी एक हरिदिनी म्हणजेच एकादशी आणि एकमेव उपास्य दैवत म्हणजे पंढरीचा पांडुरंग. इतर कोणतेही तीर्थव्रत करण्याची आवश्यकता नाही. कोणतीही 'हेदरी येदरी दैवतें' पुजण्याची आवश्यकता नसून अन्य साधनांकरिता जीवाना आटापिटा करण्याची गरज नाही. संत तुकोबांच्या भाषेत

असे उभा हा विटेवरी उभा । धरुनी कट्सुत्र हे भक्तीलोभा ।।
पुढे वाटदावी भवसागराची । विठो माउली सिद्ध हे साधकांची ।।

असा सर्वालागी आमचे उपास्य दैवत कटेवर हात ठेऊन सर्व साधकांना भवसागराची सिद्ध वाट दाखवत भक्तांसाठी सदैव तिष्ठत उभा आहे.

**हरीकीर्तनः**

वारकरी संप्रदायाची सर्वोच्च अभिव्यक्ती कोणती असेल तर ती म्हणजे हरीकीर्तन ! कीर्तनाचे विविध प्रकार आहेत त्यापकी उत्तम म्हणजे हरिकीर्तन ! इतर कीर्तनाच्या तुलनेत हरिकीर्तनाची गोडी आणि बाज काही वेगळाच आहे. संत नामदेवांनी पहिल्यांदा पंढरपूरच्या वाळवंटात हरिकीर्तन करून भूतलावरील सामान्य जणांना महत्वपूर्ण जीवनतत्व प्रकट करण्याचे महत्कार्य करून वारकरी संप्रदायास एक आयाम दिला. ''नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी'' सारखं सोपं साधन सांगून सामान्य लोक कसे विचाराने समृद्ध आणि स्वावलंबी होतील (?) हा सहज सोपा कीर्तन विचार लोकाभ्मुख केला. श्रीमद् भागवत ग्रंथामध्ये कलियुगात केवळ कीर्तनच श्रेष्ठ कसे आहे याचा उल्लेख आढळतो.

कृते यद् ध्यायतो विष्णुं त्रेतायां यजतो मखैः।
द्वापरे परिचर्यायां कलौ तद्धरिकीर्तनात।। (श्रीमद् भागवत)

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

कृत, त्रेता, द्वापार आणि कली या चार युगात एक एक भक्तीचे श्रेष्ठ साधन सांगितले आहे. त्यातील कलियुगातील माणसाच्या सर्वांगीण विकास आणि उद्धारासाठीचे सर्वोत्कृष्ठ साधन म्हणजे हरिकीर्तन ! त्याचप्रमाणे संत ज्ञानेश्वर कीर्तनाच्या बाबतीत लिहितांना कीर्तन म्हणजे कलियुगातील सवोच्च विचाराविष्कार आहे याचे प्रतिपादन करतात. ''तरी कीर्तनाचे नी नट नाचे । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचे । ते नावच नाही पापाचे । ऐसे केले।।'' ह्या ओव्या लिहून कीर्तन श्रोता आणि वक्ता दोघांनाही अंतर्बाह्य शुद्ध करण्याचे महत्कार्य करते. याशिवाय संत तुकाराम महाराज ''कलीयुगा माजी करावे कीर्तन । तेणे नारायण देईल भेटी।।'' असे लिहून ईश्वर प्राप्तीचे हे सर्वात सहज सोपे साधन असल्याचे प्रतिपादन करतात. हे विषद करत असतांना तुकोबाराय हरीकीर्तन करायला ''सकळांसी येथे आहे अधिकार । कलियुगी उद्धार हरीच्या नामे ।।'' हा अभंग लिहून हरिकीर्तन हे सर्वांसाठी खुले असल्याचे परातीप्दन करतात. संत एकनाथ महाराज हरीकीर्तन किती श्रेष्ठ आहे याचे अनेक अभंग लिहितात.

नित्य नवा कीर्तनी कैसा ओढवला रंग । वक्ता आणि श्रोता स्वये झाला श्रीरंग ।।

म्हणजे वक्ता आणि श्रोता एका सम पातळीवर आणून ठेवण्याचे महान कार्य हरिकीर्तन करत असते. अक्षरशः ईश्वराला सुद्धा हरिकीर्तन आवडते याचा ''कीर्तनाची गोडी । देव निवडी आपण।।'' हा अभंग म्हणजे जिवंत दाखलाच आहे. म्हणजे वारकरी सांप्रदायात हरीकीर्तनाला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे दिसून येते.

हरीकीर्तन मर्यादा:

वारकरी संप्रदायात हरिकीर्तन हा सर्वोत्तम वारकरी अविष्कार असून या माध्यमातून अ... नवविचार लोकाभिमुख करता येतात. वारकरी संतांनी हरिकीर्तन भक्ती, नाम महात्म्य स... समाजप्रबोधनाचे माध्यम म्हणून अप्युक्त करतांना अनेक मर्यादा सुद्धा स्वत:साठी आखून घेतलेल्या ... येतात. हरिकीर्तन माणसाचे अंग अंग हरिरूप करून टाकते एवढे ते श्रेष्ठ आहे. परंतु वारकरी ... करताना संतांनी काही मर्यादा आखून घेतल्या आहेत. वारकरी संप्रदायाचा खांब म्हणून ओळखले ... संत एकनाथ कीर्तनाची मर्यादा सांगत असतांना लिहितात,

संत एकनाथ कीर्तनाची मर्यादा सांगत असतांना लिहितात,

सगुण चरित्रे परम पवित्रें सादर वर्नावी । सज्जनवृंदें मनोभावे आधीं वंदावीं ।।१।।

सगुण चरित्रे परम पवित्रें सादर वर्नावी । सज्जनवृंदें मनोभावे आधीं वंदावीं ।।१।।
संतसगे अंतरंगे नाम बोलावें । कीर्तनरंगें देवा सन्निध सुखें डोलावें ।।२।।
भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतरां न कराव्या । प्रमभरें वैराग्याच्या युक्ति विवराव्या ।।३।।
जेणे करुनी मुर्ति ठसावी अंतरीं श्रीहरीची । ऐशी कीर्तनमार्यादा आहे संतांच्या घरची ।।४।।
अद्वय भजने अखंड स्मरणें वाजवीं करटाळी ।
एका जनार्दनीं मुक्त होय तत्काळीं ।।५।। (संत एकनाथ गाथा ३२६३)

या अभंगद्वारे वारकरी कीर्तन मर्यादा विषद करतांना संत एकनाथ महाराज अंतरंगातून ... डोलत डोलत अक्षरश: प्रत्यक्ष पांडुरंगानुभूती कीर्तनात यावी. त्याचबरोबर कीर्तनकाराने भक्ती, ज्ञान, ... वैराग्य याचे असे अप्रतिम विवेचन करावे जेणे करून कीर्तनकारासह प्रत्येक श्रोत्याच्या अंतरंगात ईश्वर... मूर्ती उभी रहावी. 'देव झाले अवघे जन'' अशी सुंदर भावना निर्माण होऊन देव आणि भक्त हे वेगळे ... शिल्लकच राहू नये. अशी कीर्तन मर्यादा विषद करत असतांना संत एकनाथ एकावर एक कीर्तनम... विषद करणारे अभंग लिहून कीर्तनकारांना सावध करताना दिसतात.

कीर्तनें सिद्धि कीर्तनें सिद्धि । कीर्तनें निरसे आधिव्याधी ।।१।।
कीर्तनें काया कीर्तनें माया । कीर्तनें सर्व एक ठाया ।।२।।
द्वंद्व द्वैत भेद नुरेची ठाव । कीर्तनीं तिष्ठें उभाचि देव ।।३।।
निद्रेमाजीं वोसणें देवो । म्हणें मज ठावो कीर्तनीं ।।४।।
एका जनार्दनीं कीर्तनासाठी । देव धावें भक्तापाठीं ।।५।।(संत एकनाथ गाथा ७८३)

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

हा अभंग तर कीर्तन मर्यादा सांगणारा उच्च कोटीचा अभंग असून यात संत एकनाथांनी कीर्तन केल्याने काय काय साध्य होते याची जणू यादीच दिली आहे. कीर्तनाने आपल्याला हवे तसे ज्ञान प्राप्त होऊन माणूस माया–मोह विरहीत होऊन उच्च दर्जाचे योगमय जीवन जगू शकतो. कीर्तनाने माणसाच्या मनातील द्वंद्वभाव संपुष्टात येऊन माणसाचाच देव होऊन कीर्तनात उभं राहतो. कीर्तनाने माणसाची जागृत आणि स्वप्नी सारखीच अवस्था होऊन प्रत्यक्ष ईश्वरच कीर्तनकाराच्या जगण्याचा अविभाज्य भाग होऊन जातो. याशिवाय नाथांनी ''कीर्तनाची मर्यादा कैसी'' ''करीता कीर्तन श्रवण'' आणि अन्य अभंग लिहून भविष्यकाळात कीर्तनकारांना मर्यादा घालून दिल्या आहेत. अगदी याच आशयाचे अनेक अभंग संत तुकारामांनी लिहून कीर्तन मर्यादा विषद केलेली निदर्शनास येते. एका अभंगात संत तुकोबाराय लिहितात

जेथें कीर्तन करावें । तेथें अन्न न सेवावें ।।१।।
बुका लावूं नये भाळा । माळ घालूं नये गळां ।।धृ।।
तटा वृषभासी दाणा । तृण मागों नये जाणा ।।२।।

...न द्रव्य घेती । देती ते ही नरका जाती ।।३।।

हा अभंग म्हणजे कीर्तन मर्यादेचा जणू कळसच आहे. संत तुकारामांचे लेखन हे अलौकिक तत्व ...जाताना हरिकीर्तनाची मर्यादा विषद करते आहे. समाजातील बारीक सारीक बाबींचा खोलवर विचार ...न तुकोबाराय कीर्तन मर्यादा सांगतांना कीर्तन केले त्या ठिकाणी अन्न–पाणी घेऊ नये, कपाळी बुक्का ...वून घेऊ नये, हार घालून घेऊ नये, एवढेच काय बैल गाडीत किंवा घोड्यावर प्रवास केला असेल तर ...ला गवत आणि घोड्याला दाणे सुद्धा तिथले खावू घालू नयेत. एवढे शुद्ध भावाने कीर्तन करावे आणि ...र का काही व्यवहार झाला किंवा केला गेला तर घेणाऱ्या बरोबर देणाराची सुद्धा अधोगती झाल्याशिवाय ...त नाही. दोघांनाही त्याचे फळ नक्की भोगावे लागते असे तुकोबाराय लिहून भविष्यातील कीर्तनकारांना ...क्याची सुचना देऊन रेड बल्ब लावून ठेवतात. याशिवाय

उभ्या बाजारांत कथा । हे तो नावडे पंढरीनाथा ।।१।।

अवघे पोटासाठी ढोंग । तेथे कैचा पांडुरंग ।।२।।

लावी अनुसंधान । काही देईल म्हणवून ।।३।।

काय केले गंडालेका । तुला राजी नाही तुका ।।४।। (तुकाराम गाथा २४८८)

हा अभंग लिहून तुकाराम महाराज कीर्तन करून ढोंगी पणाचा आव आणणाऱ्या कीर्तनाकारांचे पितळ उघडे पडतात. भर बाजारात कीर्तन करणे हे चुकीचे असून ते ईश्वराला कधीच आवडत नाही. ही सर्व पोटासाठी केलेली सोंगे असून काहीतरी प्राप्ती व्हावी यासाठी ही केवळ नाटके आहेत. असे कीर्तन करणे म्हणजे किर्तनकाराने आपल्या बायका–मुलांना पोसण्यासाठी केलेले ढोंगच आहे. अशा ढोंगी आणि अपेक्षा ठेवणाऱ्या कीर्तनकारांचा तुकोबा निषेध करतांना दिसतात. याशिवाय संत तुकोबांचे अनेक अभंग आहेत ज्यामध्ये त्यांनी वारकरी कीर्तन मर्यादा विषद केली आहे. हे सगळे अभंग वाचून त्यांचे सिंहावलोकन केले असता सर्वच संतांनी कीर्तनाला अनेक मर्यादा घालून दिल्या आहेत हे प्रकर्षाने लक्षात येते.

### वारकरी संप्रदाय वर्तमान

वारकरी संप्रदायाचे वर्तमान म्हणजे अगदी माउलींच्या भाषेत सांगायचे झाले तर ''त्याचा वेलू गेला गगनावरी'' अशी सुंदर अवस्था झालेली दिसून येते आहे. सर्वत्र कथा–कीर्तनांची रेलचेल सुरु असून अनेक युवा कीर्तनकार अभ्यासपूर्ण कीर्तन मांडणी करतांना दिसत आहेत. देहू, आळंदी, पंढरपूर आणि महाराष्ट्रातील अन्य छोट्या मोठ्या शहरांत वारकरी शिक्षण संस्थांच्या माध्यमातून वारकरी संप्रदायाचे शिक्षण दिले जात आहे. विविध दूरदर्शन कंपनी चॅनेलच्या माध्यमातून सकाळ संध्याकाळ हरिकीर्तन प्रक्षेपित होत आहे. सर्वत्र वारकरी सांप्रदायिक कार्यक्रम वाढले असून अनेक नवोदित कलाकार मंडळ वारकरी संप्रदायासाठी काम करतांना दिसत आहेत. सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे आणि संत एकना... महाराज संस्थान, पैठण आणि अन्य काही शैक्षणिक संस्थांनी वारकरी सांप्रदायिक शिक्षणाचे विविध कोर्से चालू केले आहेत. अनेक युट्यूब आणि फेसबुक चॅनेलवर अनेक अभ्यासू, नामांकित कीर्तनकारांची की... लोकांना सहज ऐकायला मिळत आहेत. कीर्तन क्षेत्रांत सुद्धा तंत्रज्ञानाने क्रांती घडवून आणली अ... दिवसेंदिवस वारकरी संप्रदाय लोकाभिमुख होतांना दिसतो आहे. वारकरी सांप्रदायिक घडामोडी अ... विविध पैलूंशी सर्व लोक परिचित होतांना दिसत आहेत.

### वारकरी संप्रदाय अपेक्षा

वर्तमानात सर्वत्र वारकरी संप्रदाय प्रसारित झाला आहे ही खूपच अभिमानाची आणि गौर...

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

बाब आहे. आज घडीला सामान्य माणसांना वारकरी सांप्रदायिक संतांची ओळख झालेली दिसून येत आहे. वारकरी संतांचे वाङ्मय सर्वांना परिचित झाले आहे. असे असले तरी आज वारकरी संप्रदायाच्या लोकांकडून अपेक्षा वाढल्या आहेत. सर्वत्र किर्तनांचा गजर सुरु असतांना कीर्तनाची मुळ तत्वे बाजूला जाऊ नयेत हीच एक अपेक्षा आहे. कीर्तन म्हणजे मनोरंजन, किंवा निव्वळ विनोद नव्हे याचे मुद्दा भान वर्तमानात कीर्तनकारांना हवे आहे. अति हव्यास आणि प्रसिद्धीसाठी काही कीर्तनकार वारकरी तत्वे विसरून तर जात नाहीत ना (?) अशी अनामिक भीती कधी कधी अस्वस्थ करते. कीर्तनाच्या माध्यमातून प्रबोधन होत असतांना सामान्य माणसांनी संतांच्या विचारांची कास धरणे अपेक्षित आहे. कीर्तनकारांनी आपल्या कक्षा किंवा मर्यादा ण सोडता कीर्तन करावे. अभ्यास करून एकाच तास परंतु आपण निवडलेल्या अभंगाला न्याय देण्याचा पुरेपूर प्रयत्न व्हावा हीच माफक अपेक्षा आधुनिक कीर्तनकार मंडळीकडून आहे आणि निश्चितपणे ही अपेक्षा ते पूर्ण करतील यात तिळमात्र शंका नाही.

**समारोप**

वारकरी संप्रदायाच्या अनुषंगाने विचार, लक्षणे आणि आचरण प्रधानता या अनुषंगाने हा लेखन प्रपंच करत असतांना एकच अपेक्षा म्हणजे ''औषध फुकाचे परंतु पथ्य लाखाचे'' या म्हणी प्रमाणे किंवा ''जेणे विठ्ठल मात्रा घ्यावी तेणे पथ्य सांभाळावी'' या संत वचनाप्रमाणे आज घडीला संप्रदायात विविध आघाड्यांवर काम करत असतांना तुमची आमची आणि सर्वच संप्रदायातील पायिक मंडळींच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. सगळीकडे कार्यक्रमांची रेलचेल असतांना जन सामन्यांमध्ये काही चुकीचे संकेत जाऊ नयेत याची खबरदारी घेणे अगत्याचे आहे. कीर्तनकार मंडळी ज्या प्रकारे व्यावहारिक संकेत मोडीत काढून आपल्या कीर्तनाचा आव्वाच्या सव्वा भाव ठरवत आहेत असे समाजात बोलले जात आहे. आजकाल  कीर्तनकार हे केवळ पैसे कमावण्याचे साधन म्हणून कीर्तन करत आहेत असे लोक दबक्या आवाजात बोलत आहेत. अनेक महाराज मंडळींनी स्वतःच्या कीर्तनाचे निश्चित भाव ठरवून टाकले आहे असेही लोकांत आजकाल चर्चा ऐकली जात आहे. याच बरोबर वारकरी संप्रदाय माणसांच्या वर्तनी उतरणे अपेक्षित आहे. वारकरी सांप्रदायिक माणसाने आणि कीर्तनाकाराने श्रीमद भागवत गीतेच्या १२ अध्यायातील ''अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च । निर्ममो निरहङ्कारः समदुःखसुखः क्षमी।'' या श्लोकांप्रमाणे वर्तन करणे अत्यंत गरजेचे आहे. वारकरी संप्रदायाला केवळ बोलके पोपट निर्माण करायचे नसून त्यांनी संतांची प्रमाण वचणे आपल्या वर्तनात आणून सामान्य लोकांची वारकरी संप्रदायाकडे पाहण्याची दृष्टी निकोप करण्याचा सदैव प्रयत्न करणे नितांत गरजेचे आहे. तेंव्हा वारकरी संतांचा एकतरी विचार प्रत्येकाने आचरणात आणून ज्ञानोबा–तूकोबांनी आपल्याला सोपवलेले हे परमार्थ नावाचे निखळ, अनमोल धन मोठ्या जबाबदारीने जतन करून पुढच्या पिढीच्या हाती सुपूर्द करून आपल्या उत्तरार्धातील ...मय आनंदाने घालवावा हीच केवळ अपेक्षा ! धनयवाद ! रामकृष्णहरी !

**संदर्भ**


१. https://maharashtratimes.com/editorial/sagun-nirgun/sagun-nirgun-by-prasad-maharaj-amalnerkar/articleshow/84016943.cms/ प्रस्थानत्रयी

२. https://mr.vikaspedia.in/social-welfare/ संहिता

३. श्री तुकाराम बावांच्या अभंगाची गाथा. शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे. ई.स.१९७३

४. तुकाराम बावांचे चरित्र. कृष्णराव अर्जुन केळुस्कर. साकेत प्रकाशन २०१७ (तिसरी आवृत्ती)

५. तुकाराम दर्शन. सदानंद मोरे. सकाळ प्रकाशन, पुणे २०१४

६. श्री नामदेव गाथा मे.शारदा साहित्य, पुणे २००२

७. https://www.santsahitya.in/abhang-gatha/eknath-gatha/ श्री एकनाथ गाथा


Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Sonpeth Dist. Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani